अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा सरतपास
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव :– प्रवीण पांडुरंग गवस, वय :– ४७ वर्षे,

धंदा :– शेती, राहणार :– सासोली, पाटये, पुनर्वसन, ता. दोडामार्ग.

<u>**सरतपास सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. पेडणेकर यांचेकडून सुरु**</u> –

दि.०२.०५.२०२३ रोजी सासोली, वाघमळा, हेदुस येथे पंचनामा करण्याकरीता मी गेलो होतो. माझ्यासोबत संजय गवस व ठाकुर पोलीस होते. घटनास्थळ समीक्षाची आई सोनम ठाकुर हिने दाखविले. आम्ही घर क्र. ५०३, सासोली, वाघमळा येथे गेलो होतो. आम्ही गेलो तेव्हा सोनम ठाकुर बाहेर होत्या. समीक्षा ठाकुर बद्दल पोलीसांनी तिच्याकडे विचारणा केली असता समीक्षा दोन दिवसांपासून आली नसल्याचे तिने सांगितले. त्यानंतर आम्ही पंचनामा करण्याकरीता व्हरांडयातुन गेलो. तेथे उत्तरेला एक बंद खोली होती. तेथुन आम्ही हॉलमध्ये गेलो. हॉलमध्ये छोटा देवारा होता. हॉलमधुन आतमध्ये समीक्षा ठाकुर हिची खोली होती. ती खोली बंद असल्याने समीक्षाचा भाऊ साईनाथ याने ती खोली उघडुन दिली. त्या खोलीमध्ये काहीही आढळुन आले नाही. त्याठिकाणी पोलीसांनी साईनाथ समोर पंचनामा केला व आम्ही बाहेर आलो. घटनास्थळाच्या उत्तरेस मांगर असुन पुर्व–पश्चिम–दक्षिण येथे नारळ, सुपारीच्या बागा होत्या. ०२:०० ते ०३:३० च्या दरम्यान पंचनामा पुर्ण करण्यात आला. त्यानंतर मी

पंचनामा वाचुन मी त्यावर सही केली. आता मला सदरचा पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यावर अ.क्र.०२ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.त्यानंतर घराचा आराखडा तयार केला. सबब, पंचनाम्यास **नि.क्र.P–1/PW1** देण्यात येत आहे. त्याठिकाणी फोटो देखील काढण्यात आले.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे वकील श्री. एस्. ए. गवस यांचेकडून सुरु</u> –**

२) हे म्हणणे बरोबर आहे की, आम्ही पोलीसांना सांगितले व त्याप्रमाणे पोलीसांनी लिहून घेतले असे घडले नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, साईनाथ हा समीक्षाचा भाऊ आहे, असा दाखवणारा कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, त्याचप्रमाणे सोनम नावाची व्यक्ती समीक्षाची आई आहे, असा दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, घर क्र. ५०३ चा घरपत्रक उतारा पाहण्याचा योग मला त्यादिवशी आलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यामुळे घर क्र. ५०३ कोणाच्या नावे आहे, हे मला वैयक्तीक सांगता येणार नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, समीक्षा ठाकुर घर क्र. ५०३ मध्ये राहते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नाही.

३) हे म्हणणे बरोबर आहे की, ठाकुर पोलीसांनी माझ्या समक्ष आपल्या हस्ताक्षरात पंचनामा लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा कोणी

लिहीला ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, नि.क्र.P–1/PW1 वरील पंचनामा माझ्या समक्ष लिहीण्यात आलेला नाही.

४) हे म्हणणे बरोबर आहे की, मी गाव मौजे सासोली, गावठणवाडी येथे राहतो. सासोली गावात सात वाडया आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सासोली गावाबद्दल मला व्यवस्थीत माहिती आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सासोली गावाबद्दल मला काहीही माहिती नाही.

५) सदर दिवशी एकच पंचनामा करण्यात आला होता. मी एकाच पंचनाम्यावर एक सही केली. हे म्हणणे बरोबर आहे की, सासोली गावात मुख्य रस्त्याला लागुन भटवाडकर मंदिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी हॉटेल दुकाने आहेत. त्या मुख्य रस्त्याला मी फिरलेलो आहे. आज मी त्याच रस्त्याने आलो नाही कारण मी मणेरी येथे राहतो. मी मागील वर्षीपासून मणेरी येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी भटवाडकर मंदिराच्या समोर हॉटेलमध्ये बसुन सही केली. हे म्हणणे खरे नाही की, दुसऱ्या पंचानी माझ्या समक्ष सही केली नव्हती. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या पंचनाम्यावर आणखी कोणाकोणाच्या सह्या आहेत, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, ते मला सांगता येणार नाही कारण माझ्या समक्ष आणखी कोणीही पंचनाम्यावर सही केली नव्हती.

६) हे म्हणणे खरे नाही की, दि.०२.०५.२०२३ रोजी ०२:०० ते ०३:३० च्या दरम्यान आम्ही पोलीसांसोबत सोनम ठाकुर यांच्या घरात जाऊन

त्याठिकाणी पचंनामा केला व त्यावर मी सही केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या घराचा क्रमांक ५०३ असून त्याठिकाणी सोनम ठाकुर यांच्याकडे समीक्षा ठाकुर यांची चौकशी केली, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-

ठिकाणः- दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांकः- ३१/१२/२०२५. न्यायदंडाधिकारी वर्ग-१, दोडामार्ग.